# निवेदन

मी या निवेदनाद्वारे जाहीर करतो की " CONTRIBUTION OF ' PUDHARI ' TO THE SOCIO-POLITICAL MOVEMENTS IN SOUTHERN MAHARASHTRA UP TO 1972 " हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ.अरुण भोसले, यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम.फिल.पदवीसाठी सादर केला आहे. हा प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवीसाठी किंवा अन्य पदवीकेसाठी सादर करण्यात आलेला नाही.

( शुकदेव पांडुरंग शिंदे )

कोल्हापूर ।

दिनांक :२४:१२ :१९९३ .

# प्रमाणपत्र

श्री सुकदेव पांडुरंग शिंदे, यांनी इतिहास विषयातील एम.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर करावयाचा " CONTRIBUTION OF ' PUDHARI' TO THE SOCIO-POLITICAL MOVEMENTS IN SOUTHERN MAHARASHTRA UP TO 1972 " हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. श्री. शिंदे यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

डॉ. अरुण भोसले,
प्रपाठक,
इतिहास विभाग
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.
मार्गदर्शक.

Prof. and Head
Department of History,
Shivaji University,
Kolhapur.

कोल्हापूर
दिनांक : २४:१२:१९९३.

# प्रस्तावना

महाराष्ट्राच्या प्रबोधनातील वृत्तपत्रांचे योगदान लक्षणीय ठरले आहे. ` पुढारी ` आणि ` पुढारी ` कार ग.गो. जाधव यांचे महाराष्ट्रातील समाज - प्रबोधनाच्या चळवळीतील स्थान अनन्यसाधारण असेच आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण जीवनाशी समरस होऊन, मराठी वृत्तपत्रसृष्टीमध्ये स्वत:ची अशी एक वैशिष्ट्यपूर्ण मुद्रा ` पुढारी ` ने उमटविली आहे. ` समाजप्रबोधनाचे विधायक व्यासपीठ ` असा लौकिक मिळविला आहे. सन १९३९ ते १९६८-६९ पर्यन्त ` पुढारी ` कार ग.गो.जाधव यांनी सातत्याने अग्रलेख लिहिले आहेत. पुढे अधून-मधून लिहिले आहेत पण वरील कालावधीत जवळजवळ तीस वर्षे त्यांनी सातत्याने अग्रलेख लिहिले. ` पुढारी ` तल्या बातम्यांत जसा ` सनसनाटीपणा ` नव्हता तसा तो अग्रलेखातही कधी आला नाही. कुणाची टिंगल-टवाळी करण्यासाठी किंवा टोपी उडविण्यासाठी म्हणूनही अग्रलेखासाठीच्या खास जागेचा वापर करण्यात आला नाही. आपण समाजाचे एक नम्र अभ्यासक आहोत आणि त्याच समाजासाठी एक उपयुक्त शिक्षक-अध्यापक आहोत, ही ग.गो. जाधवांची मनोधारणा होती. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी ` पुढारी ` च्या माध्यमातून ` पुढारी ` कार ग.गो.जाधव यांनी संपूर्ण आयुष्य घालविले म्हणून मी एम.फिल. प्रबंधासाठी हा विषय निवडला आहे.

` दक्षिण महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळींना ` पुढारी ` चे योगदान ` ( १९३९ ते १९७२ ) प्रबंधासाठी हा विषय निवडण्याचा हेतू म्हणजे मराठी वृत्तपत्रांच्या विकासप्रवाहात कोल्हापूरच्या दै. ` पुढारी ` चे योगदान अतिशय मोलाचे आहे. मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाला ` पुढारी ` च्या या योगदानाची दखल घेतल्याखेरीज गत्यंतर नाही. मराठी वृत्तपत्रांच्या ऐतिहासिक, क्रांतिकारक व गौरवशाली परंपरेतील एक प्रभावी वारसा ` पुढारी ` ने आपल्या आतापर्यन्तच्या पन्नास वर्षांच्या काळात संपन्न व गतिमान केला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

विसाव्या शतकातील चौथ्या दशकातील भारतातील व महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण राजकीय व सामाजिक पार्श्वभूमीवर कोल्हापूरातील 'पुढारी' या वृत्तपत्राचे बीजारोपण झाले. महाराष्ट्राच्या वृत्तपत्रसृष्टित दक्षिणेकडील क्षितिजावर 'पुढारी' च्या रूपाने एक नवा तारा उदयाला आला. 'पुढारी' चे संपादक श्री. ग.गो.जाधव हे याच सुमारास मुंबईला श्री.जवळकरांच्या 'कैवारी' या वृत्तपत्रात काम करीत होते. जेधे-जवळकर हे बहुजनसमाजाचे नेतृत्व करीत होते. या नेतृत्वात म.फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या क्रांतिकारक व पुरोगामी विचारांचा पाया होता. हा वैचारिक वारसा आरंभीच्या काळात श्री.गणपतराव जाधवांना मिळाला.श्री. जवळकरांच्या अनुपस्थितीत 'कैवारी' ची सर्व जबाबदारी श्री.गणपतराव जाधवांनी घेतली. 'कैवारी' तील उमेदवारीची स्वाभाविक परिणती 'पुढारी' च्या संपादकात झाली. १९३२ साली श्री गणपतराव जाधव कोल्हापूरला परतले ते कोल्हापूर सारख्या संस्थानात व दक्षिण महाराष्ट्रातील महत्वाच्या शहरात बहुजनसमाजाच्या जागृतीसाठी, उन्नतीसाठी व त्यांच्या आकांक्षापूर्तीसाठी आपण वृत्तपत्र काढावे,चालवावे, या जिद्दीने व प्रेरणेने १९३३ साली त्यानी 'सेवक' साप्ताहिक सुरु केले.१९३७ साली 'पुढारी' साप्ताहिक सुरु केले व १९३९ साली त्याचे 'दैनिक पुढारी'-त रूपांतर झाले. कोल्हापूरातच नव्हे तर दक्षिण महाराष्ट्रात आणि मराठी वृत्तपत्रसृष्टित आपले विश्वासाचे व आदराचे स्थान टिकवून आहे.

पुढारी हे दक्षिण महाराष्ट्रातील एक अग्रगण्य दैनिक आहे.वृत्तपत्रांच्या विकसन प्रक्रियेतील आव्हान पुढारीने स्वीकारले, व्यावसाईकदृष्टया उत्तुंग यश प्राप्तीच्या विचाराने आपल्या अंगभूत धर्माला मर्यादा पडणार नाहीत याची खबरदारी घेतली. राजकीय,आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रातील प्रस्थापित प्रतिगामी हित-संबंधाचे सावट आपल्यावर पडू न देता समाज परिवर्तनाच्या प्रबोधनासी व प्रक्षेपणाशी आपले इमान राखले (याचीच जानीव )मला पुढारीचा सुवर्ण महोत्सवी विशेषांक सन १९८४ हा वाचताना झाली.

म्हणूनच मी हा विषय माझ्या संशोधनासाठी निवडला. आधुनिक काळातील नव्या मूल्यांचा परिपोष जानिवे ने करण्यात पुढारी चे पुढारीपण सामावले आहे. धार्मिक पुनरुज्जीवन वादी प्रवृत्ती, पुरोगामीत्वाच्या नावाखाली दलिताना सामाजिक न्याय नाकारणाऱ्या प्रवृत्ती, परंपरागत सामाजिक फुटीर प्रवृत्ती इ.चा निर्भिड समाचार पुढारीने घेवून नव्या मूल्यांच्या स्वीकारासाठी जनमानसात जागृती निर्माण करुन एकसंघ, स्वतंत्र, समान, संपन्न व सामाजिक न्यायाधिष्ठित समाज निर्मितीच्या प्रक्रियेत समाज प्रबोधनाद्वारे पुढारीने आपले योगदान दिले आहे.

हा प्रबंध एकून पाच प्रकरणामध्ये विभागण्यात आला आहे. पहिल्या प्रकरणात वृत्तपत्राचे स्वरुप, पुढारीची स्थापना, ग.गो.जाधव यांचे पूर्वायुष्य व पुढारीची वैशिष्ट्ये इ.माहिती दिली आहे. दुसऱ्या प्रकरणात राजकीय चळवळी, पूर्वार्ध प्रजापरिषदांची स्थापना, संस्थानांचे विलिनीकरणाबद्दल पुढारीचा दृष्टीकोन, हैद्राबाद संस्थान इ. विषयक चर्चा केली आहे. तिसऱ्या प्रकरणात राजकीय चळवळीचा (उत्तरार्ध ) यामध्ये संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, गोवा मुक्ती संग्राम, १९६२ चे चिन आक्रमण, कोल्हापूर दत्तक प्रकरण व १९६९ ची कॉंग्रेस फूट याची चर्चा करुन चौथ्या प्रकरणात सामाजिक सुधारणांचा आढावा घेवून पाचव्या प्रकरणात प्रबंधाचा समारोप केला आहे.

माझ्या प्रस्तुत संशोधनास अभ्यास व वाचक यांचेकडून योग्य दाद मिळेल असा भरवसा वाटतो.

दिनांक : २४:१२ :१९९३ ।
स्थळ - कोल्हापूर .

सुकदेव पां.शिंदे

# ऋण निर्देश

एम.फिल्. पदवीसाठी तयार केलेल्या या शोध प्रबंधाचे काम पूर्ण होण्यासाठी अनेक संस्था व व्यक्ती यांचे मला मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. तसेच अनेकांनी या कामी मला प्रत्यक्षा-प्रत्यक्षा मदत मिळाली ,त्या सर्वांचा ऋण-निर्देश करणे ही औपचारिकता नसून ते माझे आद्य कर्तव्य आहे असे मी समजतो. कारण त्या शिवाय मी माझा हा अभ्यासपूर्ण करूच शकलो नसतो.

या एम.फिल. पदवीसाठी `पुढारी` चे संपादक मा.श्री.प्रतापसिंह जाधव यांनी सर्वातोपरी मदत केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच हे सर्व करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा.प्रा.एन.डी.पाटीलसाहेब, प्राचार्य आर.डी.गायकवाड, सहसचिव प्राचार्य आर.के.शिंदे ,प्रा.चंद्रकुमार नलगे, गुरूवर्य प्रा.डी.एस.थोरात ,प्रा.के.पी.माळी यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

मी प्रस्तुत विषयाचा अभ्यास व या प्रबंधाचे लेखन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागातील माझे संशोधक मार्गदर्शक डॉ.अरुण भोसले यांनी मला प्रथम प्रेरणा दिली. मला माझ्या अभ्यासात त्यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन मिळाले.तसेच या प्रबंधासाठी इतिहास विभागप्रमुख डॉ.व्ही.एस. कदम,डॉ.बी.आर.कांबळे व विभागातील अन्य प्राध्यापक यांचेही मला मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

माझ्या विषयाची उपयुक्त संदर्भ साधने मला शिवाजी विद्यापीठाचे बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय,कोल्हापूर ,रेकॉर्ड ऑफिस,कोल्हापूर व दै.पुढारी चे ग्रंथालय,कोल्हापूर इत्यादि ठिकाणी उपलब्ध झाली. वरील सर्व संस्थातील ग्रंथपाल,अधिक्षक व इतर सेवक वर्ग यांच्या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

माझे वडिल स्व.पांडुरंग शिंदे यांच्या आशिर्वादामुळे व आई, तसेच माऊ बहिण व पत्नी सौ.सुनंदा शिंदे यांच्या प्रोत्साहनामुळे मी हा प्रबंध पूर्ण करु शकलो. त्याबद्दल त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

माझे सहकारी मित्र प्रा.महात्माजी शिंदे, प्रा.जे.बी.थोरात,देवकर, बी.डी.सामकर,शेजवळेसर,प्रा.मेनकुदळे,प्रा.संजय डी.पाटील,प्रा.हरी कांबळे, प्रा.अशोक माने, शिवाजी भोसले (खवासपूर ) यांनी सहकार्य केल्याबद्दल तसेच माझे मित्र अॅड.राजकुमार पाटेकर ,हरीदास पवार, सुभाष गडेकर, यांनीही वेळोवेळी आर्थिक मदत केली व प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. विद्यापीठातील मित्र बचुटे, मोहळे,यादव, खिचीतकर,गिड्डे,संजय क्षीरसागर, नागेश पाटील,वसंत शिंदे,पांडुरंग पवार,सुतार सर,`पुढारी` ग्रंथालयातील देशपांडे,कु.उषा घाटगे, तसेच आर्टस ,कॉमर्स व सायन्स कॉलेज ,मलकापूर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय ,पंढरपूर,जि:सोलापूर येथील प्राध्यापक, वर्ग व विद्यार्थ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या प्रबंधाचे टंकलेखनाचे काम श्री बाळकृष्ण रा.सावंत,कोल्हापूर यांनी अल्पावधित सुबकपणे पूर्ण केल्याबद्दल त्यांचा आभारी आहे.

दिनांक :२४ :१२:१९९३.　　　　　　सुखदेव पांडुरंग शिंदे

स्थळ : कोल्हापूर.

# अ नु क्र म णि का


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | - प्रस्तावना | |
| | - ऋणनिर्देश | |
| प्रकरण पहिले | - पुढारी व पुढारीकार : पूर्वपिठीका | १ ते २७ |
| प्रकरण दुसरे | - राजकीय चळवळी ( पूर्वार्ध ) | २८ ते ७० |
| प्रकरण तिसरे | - राजकीय चळवळी ( उत्तरार्ध ) | ७१ ते ११० |
| प्रकरण चौथे | - सामाजिक सुधारणा चळवळ | १११ ते १४० |
| प्रकरण पाचवे | - समारोप | १४१ ते १५० |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १५१ ते १५३ |